रायगड जिल्ह्यात वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट, ज्यूसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादना साठी तालुका निहाय वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
-: संपर्क :-
विहा एन्टरप्रायजेस
9004563266
8888570393

दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com

● वर्ष १७ वे ● अंक १८४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.४ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल एसटी आगार प्रश्न ; प्रवासी संघ आक्रमक; उपोषणाचा इशारा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल एसटी आगाराच्या दुरावस्थेबाबत प्रवासी संघ आक्रमक झाला असून या स्थानकाच्या दुरुस्तीकामाबाबत पुढाकार न घेतल्यास येत्या १ नोव्हेंबर पासून उपोषणाचा इशारा प्रवासी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिला.**

या पत्रकार परिषदेला प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ भक्तीकुमार दवे, उपाध्यक्ष यशवंत ठाकरे, सचिव श्रीकांत बापट व मध्य रेल्वे सल्लागार समिती सदस्य अभिजीत पाटील उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ भक्तीकुमार दवे यांनी वेळोवेळी शासनाकडे केलेल्या पाठपुरावा संदर्भात माहिती दिली.

तसेच यावेळी वेळोवेळी केलेल्या आंदोलने व वरिष्ठांची बैठक आदी बाबत स्थानिक आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुद्धा सहकार्य केल्याचे सचिव श्रीकांत बापट यांनी सांगितले. तर अभिजित पाटील यांनी एसटी स्टँडच्या दुरावस्थेबाबत संताप व्यक्त करून महामंडळाच्या मनमानी कारभाराचा त्यांनी निषेध केला आहे. तसेच प्रवाशी वर्गांना भेडसावणाऱ्या समस्या अत्याधुनिक पद्धतीने आगार उभारण्यासंदर्भात त्यांनी आवश्यक त्या सूचना केल्या. शासनाने आमच्या मागणीची दखल घेऊन प्रत्यक्ष काम सुरु करावे अन्यथा आम्हाला उपोषण करावे असे सांगितले.

**एसटी स्टॅन्ड प्रश्न व रेल्वे स्थानकातील प्रवासी प्रश्न याबाबत आम्ही सातत्याने आमच्या परीने शासनाकडे पाठपुरावा करत असून लवकरच आम्हाला यश मिळेल अशी आशा वाटते.**
**डॉ.भक्तीकुमार दवे (अध्यक्ष, प्रवासी संघ)**



**एस टी स्टँडच्या प्रश्नासाठी आम्ही शासनाकडे यापूर्वी पाठपुरावा केला आहे. व आगामी काळात सुद्धा करणार आहे. सर्वच राजकीय पक्षांनी या नागरी प्रश्नासाठी एकत्रित येऊन लढा देणे गरजेचे आहे.**
**अभिजीत पाटील**
**(मध्य रेल्वे सल्लागार समिती सदस्य)**

# अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणूक जाहीर ; ३ नोव्हेंबरला मतदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

निवडणूक आयोगाकडून सोमवारी अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार १४ ऑक्टोबरपर्यंत या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. त्यानंतर ३ नोव्हेंबरला अंधेरी पूर्व मतदारसंघात मतदान होईल. तर ६ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाईल.

शिवसेनेचे आमदार रमेश लटके यांचा दुबईत हृदयविकारच्या झटक्याने मृत्यू झाला होता. त्यामुळे ही जागा रिक्त झाली होती. एखाद्या आमदाराचा मृत्यू झाल्यास सहा महिन्यांच्या आत संबंधित मतदारसंघात पोटनिवडणूक घेणे गरजेचे असते. त्यानुसार निवडणूक आयोगाने अंधेरी पूर्व मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी आता शिवसेना आणि भाजपने आपले उमेदवार अगोदरच जाहीर केले आहेत. तर दुसरीकडे या निवडणुकीसाठी शिवसेनेला धनुष्यबाण हे चिन्ह वापरता येणार का, हेदेखील पाहावे लागेल.

शिंदे गटाने इथे उमेदवार देत पोटनिवडणूक लढवण्याची तयारी केली होती. मात्र आता ही जागा भाजपने आपल्या घेतल्याने अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत आता शिवसेना उद्धव ठाकरे गट विरुद्ध भाजप असा सामना रंगणार आहे. उद्धव ठाकरे गटाकडून दिवंगत आमदार रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली



आहे. शिंदे गटाकडून ही जागा आपल्याकडे घेतल्यानंतर आता भाजपा निवडणूक प्रचारासाठी सज्ज झाला आहे. भाजपाकडून मुरजी पटेल हे रिंगणात उतरणार आहेत. अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपा निवडणूक प्रचार मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन आज भाजप मुंबई अध्यक्ष आणि अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीचे प्रभारी आशिष शेलार यांचे हस्ते करण्यात आले होते.

## राष्ट्रवादीची ताकद शिवसेनेच्या पाठीमागे उभी करू : शरद पवार

अंधेरी पूर्व जागेसाठी पोटनिवडणूक होते आहे. भाजप आणि शिवसेनेत सामना होणार आहे, आपला पाठिंबा कुणाला असणार? या पत्रकारांच्या प्रश्नावर क्षणाचाही विलंब न लावता राष्ट्रवादीची ताकद आम्ही शिवसेनेच्या पाठीमागे उभी करु, असं उत्तर शरद पवार यांनी दिलं. महिनाभरावर आलेल्या निवडणुकीत अंधेरी पूर्वच्या जागेवर आम्ही शिवसेनेला सहकार्य करु, अशी आमच्या पक्षाची भूमिका आहे, असं शरद पवार यांनी स्पष्ट केलं.

# कर्जत नगरपरिषदेचा स्वच्छ सर्वेक्षणात देशात पाचवा क्रमांक



**दै.रायगड नगरी । कर्जत**

स्वच्छ सर्वेक्षण २०२१-२२ मध्ये कर्जत नगर परिषदेने चमकदार कामगिरी केली असून स्वच्छता अभियानामध्ये देशात पाचवा क्रमांक तर महाराष्ट्रातील पश्चिम विभागात पहिला क्रमांक मिळाला आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये लहान शहरतील गटामध्ये सर्वात स्वच्छ शहर म्हणून कर्जत नगरपरिषदेला संपूर्ण भारतात पाचवा क्रमांक मिळाला आहे.तसेच २५००० ते ५०००० हजार लोकसंख्या मध्ये पश्चिम विभागात पहिला क्रमांक मिळाला आहे.

कचरा संकलन, वाहतूक व्यवस्था,ओला-सुका कचरा वर्गीकरण व त्याची विल्हेवाट लावणे, घनकचरा प्रकल्प, रस्ते सफाई, गटारे, शहरातील प्लॉस्टिक बंदी, सेफ्टी टँक मधील मैल्यावर प्रक्रिया , बांधकाम राडा रोडा त्याच्या वर प्रक्रिया करून पेव्हर ब्लॉक बनविणे या कर्जत नगरपरिषदेच्या कामावर निरीक्षण करून केंद्र शासनाने याची दखल घेतली होती.

१ ऑक्टोबर रोजी नवी दिल्ली येथील ताल गटोरा स्टेडियम येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थित केंद्रीय नागरी विकास व गृहनिर्माण राज्यमंत्री कौशल किशोर यांच्या हस्ते कर्जत नगरपरिषदेला पुरस्कारा सन्मानित करण्यात आले,हा पुरस्कार घेण्यासाठी कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी वैभव गारवे, तत्कालीन मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, बांधकाम सभापती राहुल डाळींबकर, नोडल अधिकारी सुदाम म्हसे, सुनिल लाड उपस्थित होते.

२०१६ पासून सलग पाच वर्ष कर्जत नगरपरिषद स्वच्छ सर्वेक्षण अभियान स्पर्धेत भाग घेत आहे, २०२१व २०२२ सलग दोन वर्ष नगरपरिषदेने स्पर्धेत चमक दाखवली आहे, मागील वर्ष ९ कोटी रुपयाचा निधी बक्षीस रूपाने प्राप्त झाला होता, यावर्षी बक्षीस रूपाने १३ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होणार आहे.

# ई-रिक्षाच्या समर्थनार्थ माथेरानकर एकवटले

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मा. सुप्रीम कोर्टाने राज्य शासनाला दिलेल्या आदेशानुसार माथेरान मध्ये पर्यावरण पूरक ई-रिक्षाची प्रायोगिक तत्त्वावर चाचणी घेण्यात यावी असे निर्देश दिलेले असताना अद्यापही ई-रिक्षाच्या चाचणीला गती मिळत नसल्यामुळे लवकरात लवकर ही चाचणी घेऊन येथील शालेय विद्यार्थ्यांना, अपंग, जेष्ठांना त्याचप्रमाणे पर्यटकांसाठी स्वस्त आणि सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीकोनातून याठिकाणी ही महत्वाकांक्षी व्यवस्था सुरू व्हावी.नागरिकांना त्यांचा मूलभूत अधिकार प्राप्त व्हावा यासाठी माथेरान मधील सर्व ई-रिक्षाचे समर्थक एकवटले होते.

आज दि.३ रोजी व्यापारी मंडळामार्फत ई रिक्षाच्या समर्थनार्थ तसेच मुख्य रस्त्याचे अपूर्णावस्थेत असलेले काम लवकर पूर्ण करावे यासाठी नगरपरिषदेवर सकाळी अकरा वाजता मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते त्यास समस्त व्यापारी वर्गाने शंभर टक्के आपली दुकाने बंद ठेऊन ह्या मोर्चाचे समर्थन केले त्यास गावातील सर्वच स्तरातून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. यामध्ये काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना( शिंदे गट),जेष्ठ नागरिक संस्था, दिव्यांग सेवा संघटना, धोबी समाज, रेल्वे स्टेशन हमाल संघटना, गुजराती समाज, स्थानिक लोजिंग चालक मालक संघटना, रखी विभाग, कुशल कामगार संघटना, अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटना, वन ट्री हिल पॉईंट विभाग, युवा रुखी गुजराती समाज, भारतीय बौद्ध महासभा,श्रमिक रिक्षा संघटना त्याचबरोबर अन्य लोकांनी या मोर्चाच्या समर्थनार्थ व्यापारी मंडळाला पत्र देऊन जाहीर पाठिंब्यासह मोर्चात आपल्या लहान मुलांना सुध्दा सोबत घेऊन जवळपास सातशे जणांनी आपला सहभाग नोंदवला यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती.विशेष म्हणजे काही राजकीय पक्षांच्या दुटप्पी भूमिका असणाऱ्या महत्वाकांक्षी नेत्यांनी केवळ आगामी निवडणुकीतील मतांसाठी या गावाच्या मूलभूत अधिकाराकडे पाठ फिरवली होती.

यावेळी नगरपरिषदेच्या सभागृहात प्रशासक सुरेखा भणगे यांना व्यापारी मंडळीनी ई रिक्षाची चाचणी लवकरात लवकर घेण्यात यावी आणि अपूर्ण रस्त्याच्या कामांना गती मिळावी या आशयाचे निवेदन सादर केले त्यावेळी आम्ही येत्या पंधरा तारखेच्या पूर्वी ई रिक्षाची तीन महिन्यांसाठी पायलट प्रोजेक्ट वर चाचणी घेणार आहोत आणि उर्वरित जी काही रस्त्याची अपूर्ण कामे आहेत ती पुर्ण करून दिली जातील असे आश्वासन दिले. यावेळी व्यापारी संघटना अध्यक्ष राजेश चौधरी, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, ई रिक्षाचे याचिका कर्ते सुनील शिंदे, वन समिती अध्यक्ष योगेश जाधव,माजी उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, हरिभाई मेहता,माजी नगरसेवक प्रकाश सुतार,प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव,चर्मकार समाज अध्यक्ष गजानन अबनावे, पतसंस्था सभापती हेमंत पवार, अमोल चौगुले, जनार्दन पार्टे,भास्कर शिंदे यांसह अन्य नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.




# गाव तेथे रस्ता मग टाकी गावचा रस्ता का कच्चा ; संतप्त गावकऱ्यांचा सवाल



**दै.रायगड नगरी । उरण**

मुख्यमंत्री सडक योजना व पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत सध्या शहरातील व ग्रामीण भागातील रस्त्यांचा विकास झपाट्याने होत आहे.मात्र असे असताना ही मागील पाच वर्षांपासून रखडलेल्या टाकी गावच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येत नसल्याने गावकऱ्यांना खड्डी युक्त रस्त्यातून मार्गक्रमण करावा लागत आहे. त्यामुळे गाव तेथे रस्ता मग टाकी गावचा रस्ता का कच्चा अशी संतप्त प्रतिक्रिया गावकरी व्यक्त करत आहेत.

उरण तालुक्यातील विंधणे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत समाविष्ट असणाऱ्या टाकी गावाला शिवसेना पक्षप्रमुख .../२

# पनवेलमध्ये पाणीबचतीबाबत मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेवा पंधरवड्यानिमित्त भाजप पनवेल श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जली ही जीवन या मोहिमेंतर्गत रविवारी (दि. २) मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाले असून, बृहन्मुंबई महापालिकेच्या पर्यावरण विभागा निवृत्त उपायुक्त सुप्रभा मराठे यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग या विषयावर मार्गदर्शन



केले. या कार्यक्रमाचे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.


यांच्या प्रमुख उपस्थितीत रेन वॉटर हार्वेस्टिंग फॉर लाईफ लाईव्हलिहुड या विषयावर मार्गदर्शन पर व्याख्यान झाले. या वेळी पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारोह झाला. या वेळी पन-वेल महापालिकेचे माजी सभागृह परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहराध्यक्ष जयंत पगडे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, बबन मुकादम, समीर ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, रामशेठ ठाकूर पब्लीक स्कूलच्या मुख्याध्यापीका राज अलोनी, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, रविदास पाटील, सुमीत झुंजारराव यांच्यासह पनवेल महापालिका परीक्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष, सचिव व पदाधिकारी यासोबत शाळा महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

# पाबळच्या विद्यमान सरपंच राजश्री जाधव यांचे जात प्रमाणपत्र बोगस

## जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा निर्णय

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील पाबळ ग्रामपंचायतीच्या २०१९ च्या थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत सरपंच म्हणून निवडून आलेल्या राजश्री राजाराम जाधव यांनी बोगस जात प्रमाणपत्र जोडून निवडणुक लढवली होती. व त्या निवडून ही आल्या होत्या. परंतु सखोल चौकशीअंती विद्यमान सरपंच राजश्री जाधव यांचे जात प्रमाणपत्र बोगस असल्याचा निर्णय जिल्हा जात प्रमाणपत्र समितीने दिला आहे.



पाबळ सरपंच राजश्री जाधव ह्या २००२ साली याच जातीच्या दाखल्यावर सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या. तर २००७ साली पेण पंचायत समितीच्या पाबळ गणातून खोटे कागदपत्र जोडून प्रमाणपत्रावर खाडाखोड करत मराठा ऐवजी कुणबी म्हणून नोंद करून शासनाची फसवणूक करत सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या. आत्ता २०१९ च्या पाबळ ग्रामपंचायतीची थेट सरपंच पदाची निवडणुक बोगस जातप्रमाणपत्राचे आधारे निवडणुक लढवुन निवडणुक जिंकली आहे. या बाबत याच निवडणुकीतील सरपंच पदाचे उमेदवार राजश्री नरेश शिंदे यांनी राजश्री राजाराम जाधव यांचे जातीचे दाखल्या बाबत मुंबई उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल केली होती. या बाबत तक्रारदार यांनी जोडलेल्या सबळ पुराव्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समीती रायगड यांना १६ जुन २०२२ ला पुनर तपासणी करण्याचे आदेश दिले.

त्या आदेशानुसार समितीच्या दक्षता पथका मार्फत प्रत्यक्ष तपासणी केली असता सरपंच राजश्री राजाराम जाधव उर्फ लता गणपत ठाकुर यांनी सादर केलेल्या नागोठणे येथील शाळा सोडल्याचा दाखला हिंदु मराठा म्हणुन आढळुन आला. तसेच त्यांचे प्राथमिक शिक्षण वांगणी तालुका रोहा येथील शाळेत झाले असुन तेथील दाखला सुध्दा हिंदु मराठा म्हणुन आढळुन आला आहे. हा जातीचा दाखला काढताना सोबत जोडलेला प्रभाकर महादु ठाकुर यांच्या ही शाळा सोडल्याचा दाखल्यावर हिंदु मराठा नोंद आहे. तसेच महादु तात्या ठाकुर / महादेव तात्या ठाकुर यांची रोहा तहसिलदार गाव नमुना १४ मध्ये मराठा अशी नोंद दक्षता पथकाला आढळुन आली. या दक्षता समितीने वांगणी तालुका रोहा ग्रामस्थांकडे देखिल चौकशी केली असता त्यांची जात ही मराठा असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या दक्षता पथकाने आपला अहवाल जिल्हा जात प्रमाणपत्र समिती रायगड यांचेकडे सादर केल्यानंतर २३ सप्टेंबर २०२२ रोजी विद्यमान सरपंच राजश्री राजाराम जाधव यांचा दाखला रद्द करण्याचे आदेश दिल्याने पाबळ सरपंच राजश्री जाधव यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे.

# सुर्यकांत वीरकर यांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील खांब गावचे सुपुत्र सुर्यकांत वीरकर यांचा जलसंपदा विभागातील सेवापुर्तीबद्दल विभागामार्फत एका कार्यक्रमात सहकुटुंब विशेष सन्मान करून भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सुर्यकांत वीरकर हे डिसें.१९८३ ते सप्टेंबर २०२२ पर्यंत जलसंपदा विभागातून उत्तम प्रकारे शासकीय सेवा बजावून सन्मानाने सेवानिवृत्त झाले आहेत.


## मधुस्मिता प्लाझा सह.गृहनिर्माण संस्था मर्या.

रजि नं.आर.जी.डी./पी.डब्ल्यू.एल./एच.एस.जी./टी.सी./२२८७/२००९–१०
पत्ता : प्लॉट नं.१२१, एमटीएनएल समोर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६

### जाहीर नोटीस

मधुस्मिता प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पनवेल पत्ता : सी.टी.एस.क्र.२०५/७१, एम.सी.सी.एच. सोसायटी, प्लॉट नं.१२१, एम.टी.एन.एल. ऑफिसचे समोर, एम.टी.एन.एल.रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ या संस्थेचे सभासद असलेल्या व संस्थेच्या इमारतीत पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र.१०२ धारण करणाऱ्या श्री.कन्हैयालाल फुलमल गिडवानी, यांचे नामनिर्देशन न करताच दि.२१/०५/२०१९ रोजी निधन झाले.

संस्था या, नोटीशीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे उक्त भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचा वारसदार किंवा मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार किंवा हरकतीदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत असून ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तारखेपासून १५ दिवसात संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासाठी त्याच्या / तीच्या / त्यांच्या मागण्यांच्या वा हरकतीच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत प्राप्त झाल्या नाहीत, तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासाठी कोणत्याही असल्यास हक्क मागण्या / हरकती आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीन्वये तरतूद केलेल्या रितीने कार्यवाही करण्यात येईल. संस्थेच्या नोंदणीकृत उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत संस्थेच्या सचिवांकडे उपलब्ध राहील.

सही/–
**(दिवाकर नंदकुमार समेळ)**
**मधुस्मिता प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांच्या करिता आणि वतीने**



DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM RAIGAD-ALIBAG
COLLECTOR OFFICE BUILDING, SECOND FLOOR, NEAR HIRAKOTH TALAV,
TAL-ALIBAG, DIST.RAIGAD-402201
Website : www.confonet.nic.in

Consumer Case No.22/232
Haridas Ramji Patil — Petitioner / Complainant/Appellant
Versus
M/s Dinesh Enterprises through Patner Ajrun Surate — Opposite Party / Respondent(s)

To
Opposite Party / Respondent Name :
1) M/s Dinesh Enterprises through
Patner Ajrun Surate
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206
2) M/s Diesh Enterprises through
Patner Avinash Gaikwad
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206
जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जा.नो/२०२२/१७०१
दिनांक : १४/०९/२०२२

### जाहीर प्रकटन

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्याखाली तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्वीकारत नाहीत / पत्ता बदलला / मिळून येत नाही म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दि.०४ नोव्हेंबर २०२२ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करण्यात येवून पुढील आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मे.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड–अलिबाग यांचे आदेशानुसार
ठिकाण : अलिबाग
दिनांक :

सही/–
**प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड**



मा.सोनावणे साहेब कोर्ट
ॲड.प्रिया मोरे

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.६७४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.९/११/२०२२

१) श्रीमती.ज्योती राहुल पोळ
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
२) कुमारी आर्या राहूल पोळ
वय : १२ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.रुम नं.४, बिल्डींग नं.३१ ब,
इंडियन एरलाईन्स कॉलनी, कालिना,
एअर इंडिया कॉलोनीच्या विरुद्ध,
सांताक्रुझ (ईस्ट), मुंबई ४०००२९ — अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ यांचे वडील कै.राहूल मनोहर पोळ हे दि.०१/०५/२०२१ रोजी राहते घरी म्हणजेच रुम नं.४, बिल्डींग नं.३१ ब, इंडियन एरलाईन्स कॉलनी, कालिना, एअर इंडिया कॉलोनीच्या विरुद्ध, सांताक्रुझ (ईस्ट), मुंबई–४०००२९ येथे मयत झाले. मयत कै.राहुल मनोहर पोळ यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**फ्लॅट नं.२०८, सी विंग, दुसरा मजला, साई दीप–II, गट नं.२४१, नेरे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, क्षेत्रफळ ४१० चौ.फूट कारपेट**
**एकूण मुल्यांकन रु.३०,००,०००/–**
**(अक्षरी रक्कम रुपये तीस लाख)**

कै.राहूल मनोहर पोळ यांचा मालमत्तेतील एकूण भाग : रु.१५,००,०००/– (अक्षरी रक्कम रुपये पंधरा लाख)

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशा कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३/१०/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल
(कोर्टाचा शिक्का)
सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल



DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM RAIGAD-ALIBAG
COLLECTOR OFFICE BUILDING, SECOND FLOOR, NEAR HIRAKOTH TALAV,
TAL-ALIBAG, DIST.RAIGAD-402201
Website : www.confonet.nic.in

Consumer Case No.22/233
Chandrakant Nagya Shinya — Petitioner / Complainant/Appellant
Versus
M/s Dinesh Enterprises through Patner Ajrun Surate — Opposite Party / Respondent(s)

To
Opposite Party / Respondent Name :
1) M/s Dinesh Enterprises through
Patner Ajrun Surate
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206
2) M/s Dinesh Enterprises through
Patner Avinash Gaikwad
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206
जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जा.नो/२०२२/१७०२
दिनांक : १४/०९/२०२२

### जाहीर प्रकटन

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्याखाली तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्वीकारत नाहीत / पत्ता बदलला / मिळून येत नाही म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दि.०४ नोव्हेंबर २०२२ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करण्यात येवून पुढील आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मे.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड–अलिबाग यांचे आदेशानुसार
ठिकाण : अलिबाग
दिनांक :

सही/–
**प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड**



Gunnal Judge
Adv.Asmita Bhuwad

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (JD) PANVEL
MA No.1344/2022
Exh No.7/D
Next Date : 19/11/2022

Public at large hereby inform that,
1) KIRAN RAJESH LADWAL
Age : 53
Resides-flat no.1, shivranjani Bldg.,
Plot No.16 A, Sector-21,
Kharghar, Panvel Raigad
2) Mr.Sunny Rajesh Ladwal
Age : 35
Resides-flat no.1, shivranjani Bldg.,
Plot No.16 A, Sector-21,
Kharghar, Panvel Raigad
3) Mr.Himanshu Rajesh Ladwal
Age : 34
Resides-flat no.1, shivranjani Bldg.,
Plot No.16 A, Sector-21,
Kharghar, Panvel Raigad — Applicant
V/S
1) Smt.Murtidevi Sajjansingh Ladwal
Age : 72
D-701, Kaatyayni Residency, off Mahakali Caves Road, Nera Maruti School, Andheri (East) Mumbai, Chakala, MIDC, Andheri (East) Mumbai 400093 — Respondent

Where as applicant above named has filed application before this honble court for grant of Heirship certificate in respect of the deceased late shri Rajesh Sajjansingh Ladwal who expired on 16/04/2021 at Pune, Maharashtra.

The applicant No.1 is the wife and applicant No.2 and 3 is sons of late shri Rajesh Sajjansingh Ladwal who expired on 16/04/2021 at Pune leaving behind the applicants as legal heirs. And Respondent smt.Murtidevi Sajjansigh Ladwal is mother of deceased late shri Rajesh Sajjansingh Ladwal.

The applicants says that late shri Rajesh Sajjansingh Ladwal who expired on 16/04/2021 at Pune and left no any other legal heirs except the applicants and mother of late shri Rajesh Sajjansingh Ladwal smt.Murtidevi Sajjansingh Ladwal (Respondent)

And whereas if any person has any objection in respect of heirs of late shri Rajesh Sajjansingh Ladwal., Hereby invite / submit his or her objection in this court, within 30 days from the date of publication of this notice

As such if nothing is received within the period of 30 days from the date of publication of this notice. Application of applicant shall be allowed and the Heirship Certificate as prayed for shall be granted.

Given Under May Hand and Seal of The Court On This Day of 23/09/2022

Sd/- Jr.Clerk, Civil Court Panvel
(Court Seal)
Sd/- Asst.Superident., Civil Court Panvel



## ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि. ०३/१०/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

ग्रामपंचायत कोळखेकरिता सन २०२२/२३ च्या ग्रामनिधीतून खालील वस्तू खरेदी करण्यासाठी विहित मुदतीमध्ये अधिकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद पाकीटातून निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. ०४/१०/२०२२ ते ११/१०/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. ११/१०/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | नग | योजना | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | **ग्रामपंचायत हद्दीतील खातेदारांना वाटप करण्यासाठी १४×१७ इंच लांबीरुंदीची जुको–जुट प्रकारची कापडी पिशवी खरेदी करणे. पिशवीच्या दोन्ही बाजूला प्रिटींग करणे** | ३५०० | ग्रामनिधी | १ महिने |

**अटी व शर्ती :–**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

३) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

४) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

सही/– **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोळखे**
सही/– **सरपंच, ग्रामपंचायत कोळखे**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## गावचा रस्ता का कच्चा

तथा हिन्दू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आनंद दिघे यांच्या आग्रहाखातर भेट दिली होती.त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांनी टाकी गावच्या कच्च्या रस्त्याचा उल्लेख आपल्या भाषणात केला होता.त्यानंतर नवीमुंबई परिसरातील उद्योगपती पी.पी. खारपाटील व राजाशेठ खारपाटील यांनी सदर रस्त्याचे स्वखर्चातून काम हाती घेतले.तसेच तीन वर्षांनंतर टाकी गावच्या ग्रामस्थांनी पुन्हा लोकवर्गणीतून सदर रस्त्यांचे काम हाती घेतले.

परंतु मागील तीन वर्षांपासून टाकी गावाकडे जाणाऱ्या तीन कि.मी. रस्त्याच्या दुरुस्ती कडे रायगड जिल्हा परिषदेने दुर्लक्ष केल्याने सध्या सदर रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे.सदर रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करण्यात यावे यासाठी टाकी गावातील रहिवासी तथा सामाजिक कार्यकर्ते किशोर खारपाटील,ग्रुप ग्रामपंचायत मा. सदस्य कांती जोशी, ग्रामपंचायत सदस्या शुभांगी जोशी,वसंत नाईक, सिकंदर पाटील सह इतर ग्रामस्थांनी संबंधित लोकप्रतिनिधी,रायगड जिल्हा परिषद कडे मागणी केली.परंतु आजतागायत टाकी गावच्या रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करण्याचे काम रेंगाळत पडलेले आहे.त्यामुळे गाव तेथे रस्ता मग टाकी गावचा रस्ता का कच्चा अशी संतप्त प्रतिक्रिया गावकरी व्यक्त करत आहेत.


## म्हसळा नगर पंचायत, म्हसळा

**जाहीर नोटीस**

**जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/ १६७४ / २०२२ दिनांक :- ०३/१०/२०२२**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्याप्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्रं | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक / मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४७६ पैकी | बाजारपेठ | कमर्शियल आर. सी. सी. पद्धतीत इमारत तळ मजला गाळा नं. २ | रियाज हसन वस्ता | उमेर इकबाल मेमन<br>सुहेब इकबाल मेमन |
| २ | २ | ८९१ | नवानगर | कौलारू सिमेंट रेतीत बांधलेले घर | अहमद खान उमर खान म्हैसकर | राहत अहमद खान म्हैसकर |
| ३ | २ | १८५२ पैकी | दिघीरोड | कमर्शियल आर. सी. सी. पद्धतीत इमारत तळ मजला H विंग गाळा नं. ४ | जहूर अहमद युसुफमिया दिसवाघ | शकील अहमद मुजफ्फर घनसार |
| ४ | २ | ८०६ पैकी | नवानगर पोस्ट ऑफिस जवळ | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत ३ रा मजला फ्लॅट नं. ३०५ | रितेश शामजी पटेल<br>श्रीपत भिकू मनवे | सुलोचना रामचंद्र येलवे |
| ५ | २ | १२११ पैकी | नवानगर | आयशा रेसिडेन्सी आर. सी. सी. पद्धतीत इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०२ | शाहिद महमद अली सरखोत | सिराज अ. गफ्फार मेमन |
| ६ | २ | १९५६ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | सळ सबिळ फेस २ आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला B विंग फ्लॅट नं. १०३ | मोहमद रफी अब्दुल खालीक शुक्री | झीनत शेख मोहमद मुकादम तर्फे यासिन दाऊदखान पठाण |
| ७ | २ | १९५६ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | सळ सबिळ फेस २ आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला B विंग फ्लॅट नं. १०२ | मोहमद रफी अब्दुल खालीक शुक्री | झीनत शेख मोहमद मुकादम तर्फे यासिन दाऊदखान पठाण |
| ८ | २ | ९०७ पैकी | कुंभारआळी | आर. सी. सी. पद्धतीत G + २ ची इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०४ | नसरीन अब्दुल रज्जाक उभारे | जावीद सईद गजगे<br>मेहजबीन जावीद गजगे |
| ९ | २ | ८०६ पैकी | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत G + २ ची स्टील इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०६ | रितेश शामजी पटेल<br>श्रीपत भिकू मनवे | शाहीन जावीद धनसे |
| १० | ३ | ९९० | नवानगर | कौलारू सिमेंट रेतीत बांधलेले घर | इब्राहीम अलीमिया डावरे | सलीम इब्राहीम डावरे |
| ११ | ३ | ९१०, १६००, १३२१, १८८२ पैकी | दिघीरोड | आर. सी. सी. पद्धतीत इमारत गाळे व फ्लॅट | अ.शकुर अब्दुल रहिमान उकये | महेरनिगार अब्दुल शकुर उकये<br>सलमान अब्दुल शकुर उकये<br>मुजस्सम अब्दुल शकुर उकये<br>समीना फैय्याज अर्झबेगी<br>शीरीन मुर्तुजा पल्लवकर<br>शबनम तन्वीर संबुलखानी<br>फातिमा जहूर दाऊद |
| १२ | ३ | १८०६ | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेले घर | सुरया जकि रहीमानी | मोहम्मद जकि म.उमर रहमानी<br>जैद मोहम्मद जकि रहमानी<br>अंमरा मोहम्मद जकि रहमानी<br>इकरा मोहम्मद जकि रहमानी |
| १३ | २ | ९१६ पैकी | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला फ्लॅट नं. ४ | जावीद अब्दुल शकुर पेणकर तर्फे अजरा अब्दुल शकुर पेणकर | हबीब बशीर ठोकन |
| १४ | २ | ७९७ पैकी | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०४ | सुलताना मोहम्मद अली फौजदार | अतिफ अब्दुल मजीद खोपटकर |
| १५ | २ | ९२७ | कन्याशाळा परिसर | कौलारू सिमेंट रेतीत बांधलेले घर | शरद जगन्नाथ पोतदार<br>मधुकर जगन्नाथ पोतदार | सिमा मंगेश धीमर<br>बंदगीसाब मशेकसाब मंदेवाली |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## गव्हाण, मोर्बे, नेरे येथे प्राथमिक तपासणी शिबिरास प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ आणि भारतीय जनता पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ऑक्टोबर रोजी खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. या महाशिबिराच्या अनुषंगाने तालुक्यातील मोर्बे, गव्हाण आणि नेरे येथे रविवारी (दि. २) प्राथमिक तपासणी शिबिर झाले. या उपक्रमास भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने सेवा पंधरवड्यानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत होणार्या महाशिबिराच्या अनुषंगाने मोर्बे येथील डांगर्णेश्वर मंदिर सभागृहात, गव्हाण ग्रामपंचायत हॉल आणि नेरे येथील समित्र गणेश उत्सव मंडळाच्या सभागृहात प्राथमिक तपासणी शिबिर झाले. आरोग्य महाशिबिरात सर्वसाधारण रोग, महिलांचे आजार, हृदयरोग, हाडांचे रोग, मधुमेह, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, हिमोग्लोबिन, बालरोग, त्वचा व गुप्तरोग तपासणी, दंतरोग तपासणी, नाक-कान-घसा, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, कॅन्सर तपासणी, क्षयरोग तपासणी आणि औषधोपचार मोफत देण्यात येणार आहे. त्याचबरोबर आयुष्यमान भारत डिजिटल कार्डसुद्धा या शिबिरात तयार करून देण्यात येणार आहेत. या महाशिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर यांनी केले आहे.

## आंबेवाडी सार्वजनिक मंडळाचा नवरात्री उत्सव

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

आंबेवाडी सार्वजनिक मंडळाचा नवरात्री उत्सव अनेक वर्षांपासून सुरु आहे.कोरोनाकाळात दोन वर्षे लॉकडाऊनमुळे थोडया प्रमाणात सर्व सण व उत्सव यांच्यावर बंदी घालण्यात आली होती परंतु यावर्षी निर्बंध शितील केल्यानंतर सर्व उत्सव साजरे केले जात असून आंबेवाडी सार्वजनिक मंडळाचा नवरात्री उत्सव मोठया उत्सहात साजरा केला जात आहे.आंबेवाडी नाक्यावर विविध जाती धर्माचे लोक एकत्र राहत असून ते एकत्र येऊन सर्व आयोजन अतिशय शिस्तबद्ध व उत्तम प्रकारे करतात यामुळे सर्वधर्म समभाव व एकात्मा टिकवली जात असून गरबा खेळणाऱ्यांना अल्पोहार प्रसाद देऊन प्रोत्साहन दिले जाते.सर्व कार्यक्रम यशस्वीकारण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष,सचिव,सहसचिव,खजिनदार व सर्व सदस्य मेहनत घेत आहेत.

# माथेरानमध्ये स्वच्छता मोहीम

**दै.रायगड नगरी । माथेरान**

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त माथेरान नगरपरिषदेच्या वतीने गावा-तील विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे( शिंदे ) ,पाणी पुरवठा अधिकारी अभिमन्यु येळवंडे, अन्सार महापुळे, स्वप्नील कळंबे, ज्ञानेश्वर सदगीर, एस.आई.नरेंद्र सावंत,स्नेहा साखळकर, धनगर समाजाचे माजी अध्यक्ष राकेश कोकळे त्याचप्रमाणे सफाई कामगार या स्तुत्य उपक्रमात सहभागी झाले होते.




येथील मुख्य पर्यटन विभाग असणाऱ्या शारलोट लेक परिसरात जवळपास ऐंशी गोणी प्लास्टिक बाटल्या, आणि अन्य प्लास्टिक जन्य सुका कचरा गोळा करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेसाठी माथेरानचे स्वच्छता दूत प्रमुख म्हणून राकेश कोकळे यांची निवड करण्यात आली होती.स्वतः मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी झाडू हातात घेऊन जंगलात तसेच रस्त्यावरील कचरा संकलन करण्यासाठी पुढाकार घेतला होता. अत्यंत कमी वेळात भणगे यांनी आपल्या कामाच्या एका विशिष्ट पद्धतीने स्वच्छता बाबतीत असो की अन्य कोणत्याही सामाजिक उपक्रमात हिरीरीने सहभाग नोंदवून कामाला गती दिली आहे त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

यावेळी बोलताना प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे) म्हणाल्या की, स्वछता ही सेवा, अंतर्गत सर्व स्वच्छता दुतांसोबत अधिकारी व काही गावातील तरुण यांच्या सोबत महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताचे स्वछता आणि प्लास्टिक कचरा, उचलण्याची मोहीम आज घेतली गेली. माथेरान हे अधिक स्वच्छ, सुंदर करण्यासाठी विविध कार्यक्रम न.प.वेळोवेळी करत असते. आज सुट्टी च्या दिवशी सर्व कार्यालयीन स्टाफने सुध्दा यात सहभाग नोंदवीला हे कौतुक आहे.

जवळपास १०० गोणी प्लास्टिक आम्ही ३ तासात वेचले. त्यानंतर हा परिसर खूप स्वच्छ आणि टापटीप दिसत होता, याचं समाधान खूप आहे. माथेरानची भौगोलिक परिस्थिती, वाहन व्यवस्था नसल्यामुळे सर्व कचरा डोक्यावर न्यावा लागतो. पर्यटकांसाठी जागो जागी आपण डस्टबिन ठेवले आहे, तरीही जंगलात बॉटल्स,इतर पेयच्या बाटल्या, प्लास्टिक रॅप्पर्स मोठ्या प्रमाणात पाहवयास मिळाले. त्यांना आता प्रत्येक टपरी, दुकानदार यांची एक महत्वाची बैठक घेऊन या बाबतीत चर्चा करून त्यावर नक्कीच उपाय शोधणार आहोत.

तर रमेश कोकळे म्हणाले की, प्रशासक सुरेखा भणगे यांच्या रूपाने माथेरानच्या जनतेला लाभलेल्या नवदुर्गा आहेत. गोरगरीब जनतेच्या हक्काच्या ऊन, वारा ,पावसात कशाचीही तमा न बाळगता फिल्डवर काम करणाऱ्या कार्यतत्पर प्रशासक सुरेखा भणगे यांच्या कामाची पद्धत वाखाणण्याजोगी असून अशा अधिकाऱ्यांची माथेरान गावासाठी नितांत आवश्यकता आहे त्यांनी त्यांचा कार्यकाळ माथेरान नगरीत पूर्ण करावा जेणेकरून या गावाला नवीन दिशा मिळेल. आम्ही नेहमीच अशा निस्वार्थी,कार्यशील अधिकाऱ्यांसोबत सामाजिक क्षेत्रात काम करण्यास सज्ज आहोत.

# दिघी पोलीस निरीक्षकांची उत्कृष्ट कामगिरी

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाण्यात सहा पोलिस निरीक्षक संदीप पोमन यांचे ऐंशी टक्के गुन्हे उकल केल्याप्रकरणी थेट पोलिस अधिक्षकांकडून कौतुक करण्यात आले आहे.

जिल्हा गुन्हे शाखेत असलेल्या पोलिस निरीक्षक संदीप पोमन यांची फेब्रुवारी २०२१ मध्ये दिघी सागरी पोलिस ठाण्यात नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवत गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी अत्यंत कुशल शैलीत गुन्हे आकलन व पेट्रोलिंग सुरू केले. जानेवारी ते ऑगस्ट २०२२ या आठ महिन्यात मालमत्तेविषयक ७ गुन्हे दाखल झालेले त्यांपैकी ६ गुन्हे म्हणजेच ८६ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात आली. सहा पोलीस निरीक्षक पोमन यांनी तीन लाख पंचवन्न हजार पैकी २ लाख पंच्याऐंशी हजाराचा मुद्देमाल तपासात हस्तगत केला.

याची दखल घेत, थेट पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी पोमन यांचे पत्राद्वारे कौतुक केले. पोमन यांना दिलेल्या पत्रात, पोमन हे पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी म्हणून वैयक्तिक लक्ष देऊन नियोजनबद्ध व सातत्यपूर्ण प्रयत्न केल्याने मालमत्ता गुन्हे उघडकीस व मालमत्ता हस्तगत झाली ही बाब प्रशंसनीय असल्याचे त्यांनी नमूद करून अभिनंदन केले.


सद्या कार्यरत असणाऱ्या दिघी सागरी पोलीस ठाणे हद्दीत महिलांनी केलेल्या दारू बंदी मागणीनुसार गावठी दारू पूर्णपने नष्ट करण्यासाठी पोलिसांनी पाऊल उचलले असून, काही दिवसांपासून या भागात कडक दारू बंदी करण्यात आली. तालुक्याच्या बाहेरून होणारी २०० लिटर गावठी दारूची तस्करी पकडण्याचा गुन्हा नोंद असतानाच शनिवारी तारीख १ रोजी दिघी जेटट्टी किनारी मारुती सुझुकीची वैगनार कार मध्ये होणारी ६००० किंमतीच्या दारू सह २ लाख सहा हजार रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यामुळे दिघी पोलीस निरीक्षकांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करण्यात येत आहे.



# नांदगावकरांची ग्रामदेवता : भक्तांच्या हाकेला धावणारी नांदगावची भवानी माता

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भक्तांच्या हाकेला धावणारी भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या मुरुड तालुक्यातील नांदगाव गावाला ओळखले जाते ते म्हणजे येथिल प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिरामुळेच! सिद्धिविनायक हे जागृत देवस्थान मानले जात असल्याने समस्त भक्तगणांचे ते श्रद्धास्थान आहे.परंतू नांदगावची ग्रामदेवता आहे अर्थातच भवानी देवी !



नांदगावच्या उत्तरेकडे मुरुड- अलिबाग मुख्य रस्त्यावर भवानी मातेचे मंदिर आहे.ह्या देवीचे मुख्य स्थान हे सध्याच्या मंदिरासमोर एक कि.मी.अंतरावरील साकाळे तळे येथे असलेल्या एका अति छोट्या मंदिरात होते.या परिसरात नांदगावमधिल आगरी,माळी,ब्राह्मण व अन्य, जातीची काही कुटुंब वास्तव्यास होती.त्यांचे हे दैवत म्हणजे श्रद्धास्थान होते.कालांतराने ह्या सर्व कुटुंबांनी साथीच्या रोगामुळे हे स्थान सोडले त्यामुळे मंदिर एकाकी पडले होते.

नांदगावमधिल काही मंडळींनी भवानी मातेला सध्याचे जे मंदिर आहे तेथे एका कौलारु घरात आणून तेथे तिची प्राणप्रतिष्ठा केली. नांदगावचे प्रसिद्ध मूर्तिकार बाळू चोरघे यांनी सध्याची असलेली देवीची व्याघ्रारुढ मूर्ती घडवली आहे.पूर्वी मंदिराच्या परिसरात घनदाट जंगल होते.त्या काळात मंदिरात वाघ येत असल्याचे सांगितले जाते.मंदिर गावच्या जवळपास एक कि.मी.बाहेर असल्यामुळे गावातील मंडळींचे देवीचे मंदिर एक फिरण्याचे ठिकाण बनले होते.हे दैवत येथिल काही कुटुंबाचे कुलदैवत आहे.

भवानी मातेची नित्य पूजा अर्चा मंदिराशेजारी वास्तव्यास असलेल्या बाबू नवाळे हे पूर्वापार करित असून त्यांच्या पश्चात त्यांची मुले त्यांचा वारसा नीत्यनेमाने चालवित आहेत.शेतकरी कामगार पक्षाच्या जयंतभाई पाटील यांनी आपल्या आमदार फंडातून दिलेल्या निधीतून मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे त्यामुळे मंदिराची वास्तू विलोभनीय झाली आहे.मंदिरासमोरील भव्य पटांगणात गावातील नवतरुण मंडळाने शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आहे.चैत्र शुद्ध पौर्णिमेला मंदिर परिसरात

पूर्वी यात्रा भरत असे. मंदिरानजिकचे जय भवानी भजन मंडळ येथे कार्यक्रम करते. नवरात्रौत्सवात मंदिरात घट मांडले जातात. गावच्या ब्राम्हण समाजासह अन्य लोक नऊ दिवस आरत्या म्हणतात.तरुण तरुणी दांडीया खेळतात., भजने होतात,सवाष्णी पुजनाने मंदिर गजबजून जाते.अनेक भाविक दर्शनार्थ गर्दी करतात. ही देवी नवसाला पावते म्हणून लोक मंदिरात गर्दी करतात.दोन वर्षांनंतर कोरोना महामारीचे सावट दूर झाल्याने यंदा देवीचा उत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे. असे देवळातील पुजारी मनोज नवाले यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.



# नवरात्रीच्या उत्सवात बंगाली बांधवांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवरात्री उत्सवामध्ये कामोठे परिसरातील शेकडो बंगाली बांधवांनी शिवबंधन व भगवा ध्वज हाती घेत रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. शिवसेना पक्षप्रमुख व मा. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन तसेच रायगड जिल्ह्या प्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली कामोठे मधील कामोठे बंगाल असोसिएशनच्या शिष्टमंडळासह इतर पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय खारघर येथे शिवसेना पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.

## जाहीर नोटीस

या नोटीसेव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, आमचे अशिल मे. आर के..के बिल्डकॉन इन्फ्रा एलएलपी तर्फे भागिदार १.श्री.संजय आंबु पाटील २) श्री.संदेश ज्ञानेश्वर पाटील ३) श्री.रोनक अरुण परदेशी ४) श्री हरेश्वर सुरेश परदेशी सर्व जण राहणार- चिंचपाडा, ता,पनवेल.जि.रायगड हे खालील वर्णनाचा भुखंड १) श्रीमती नंदा बाळकृष्ण नाईक २) श्री धनराज बाळकृष्ण नाईक पत्ता : डुंगी, ता,पनवेल.जि.रायगड, यांचे कडून ५०% (३०५ चौ मी) भुखंड त्रिपक्षीय करारनाम्याव्दारे हस्तातरंण करून घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन-**

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड | ४९ | ०७ | ६१०.०० चौ.मी.पैकी ५०% ३०५ चौ मी |

तरी कोणाही व्यक्तीचे / व्यक्ती किवा आर्थिक संस्थेचे भुखंड संदभात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस, भाडेपटटा, वारसा, हक्क, लोन किंवा इतर काही असल्यासहि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे. मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही किंवा हस्तांतरण झाल्यानंतर ही आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- ०३/१०/२०२२

सही/-
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभातसेंटर, सि.बि.डि बेलापूर**

---

DISTRICT CONSUMER DISPUTES
REDRESSAL FORUM RAIGAD-ALIBAG
COLLECTOR OFFICE BUILDING, SECOND FLOOR, NEAR HIRAKOTH TALAV,
TAL-ALIBAG, DIST.RAIGAD-402201
Website : www.confonet.nic.in

Consumer Case No.22/228

Rohidas Gopal Patil — Petitioner / Complainant/Appellant

Versus

M/s Dipesh Enterprises through Patner Ajrun Surate — Opposite Party / Respondent(s)

To

Opposite Party / Respondent Name :
1) M/s Dipesh Enterprises through
Patner Ajrun Surate
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206
2) M/s Dinesh Enterprises through
Patner Avinash Gaikwad
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206

जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जा.नो/२०२२/१६९७
दिनांक : १४/०९/२०२२

**जाहीर प्रकटन**

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्याखाली तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्वीकारत नाहीत / पत्ता बदलला / मिळून येत नाही म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दि.०४ नोव्हेंबर २०२२ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करण्यात येवून पुढील आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मे.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार

ठिकाण : अलिबाग
दिनांक :

सही/-
**प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड**

---

DISTRICT CONSUMER DISPUTES
REDRESSAL FORUM RAIGAD-ALIBAG
COLLECTOR OFFICE BUILDING, SECOND FLOOR, NEAR HIRAKOTH TALAV,
TAL-ALIBAG, DIST.RAIGAD-402201
Website : www.confonet.nic.in

Consumer Case No.22/229

Madhukar Janardan Kandekar — Petitioner / Complainant/Appellant

Versus

M/s Dinesh Enterprises through Patner Ajrun Surate — Opposite Party / Respondent(s)

To

Opposite Party / Respondent Name :
1) M/s Dinesh Enterprises through
Patner Ajrun Surate
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206
2) M/s Dinesh Enterprises through
Patner Avinash Gaikwad
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206

जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जा.नो/२०२२/१६९८
दिनांक : १४/०९/२०२२

**जाहीर प्रकटन**

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्याखाली तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्वीकारत नाहीत / पत्ता बदलला / मिळून येत नाही म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दि.०४ नोव्हेंबर २०२२ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करण्यात येवून पुढील आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मे.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार

ठिकाण : अलिबाग
दिनांक :

सही/-
**प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड**

---

DISTRICT CONSUMER DISPUTES
REDRESSAL FORUM RAIGAD-ALIBAG
COLLECTOR OFFICE BUILDING, SECOND FLOOR, NEAR HIRAKOTH TALAV,
TAL-ALIBAG, DIST.RAIGAD-402201
Website : www.confonet.nic.in

Consumer Case No.22/230

Ganesh Hari Patil — Petitioner / Complainant/Appellant

Versus

M/s Dinesh Enterprises through Patner Ajrun Surate — Opposite Party / Respondent(s)

To

Opposite Party / Respondent Name :
1) M/s Dinesh Enterprises through
Patner Ajrun Surate
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206
2) M/s Dinesh Enterprises through
Patner Avinash Gaikwad
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206

जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जा.नो/२०२२/१६९९
दिनांक : १४/०९/२०२२

**जाहीर प्रकटन**

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्याखाली तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्वीकारत नाहीत / पत्ता बदलला / मिळून येत नाही म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दि.०४ नोव्हेंबर २०२२ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करण्यात येवून पुढील आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मे.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार

ठिकाण : अलिबाग
दिनांक :

सही/-
**प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड**

---

DISTRICT CONSUMER DISPUTES
REDRESSAL FORUM RAIGAD-ALIBAG
COLLECTOR OFFICE BUILDING, SECOND FLOOR, NEAR HIRAKOTH TALAV,
TAL-ALIBAG, DIST.RAIGAD-402201
Website : www.confonet.nic.in

Consumer Case No.22/231

Ganesh Chandrakant Gunaji — Petitioner / Complainant/Appellant

Versus

M/s Dinesh Enterprises through Patner Ajrun Surate — Opposite Party / Respondent(s)

To

Opposite Party / Respondent Name :
1) M/s Dinesh Enterprises through
Patner Ajrun Surate
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206
2) M/s Dinesh Enterprises through
Patner Avinash Gaikwad
Gala No.34, Payal Complex, Plot No.15/D
Sector-17, New Panvel-410206

जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जा.नो/२०२२/१७००
दिनांक : १४/०९/२०२२

**जाहीर प्रकटन**

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्याखाली तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्वीकारत नाहीत / पत्ता बदलला / मिळून येत नाही म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दि.०४ नोव्हेंबर २०२२ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करण्यात येवून पुढील आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मे.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार

ठिकाण : अलिबाग
दिनांक :

सही/-
**प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड**

# संक्षिप्त...

## शेकापच्या पाठपुराव्यामुळे रात्री उरण ते पनवेल तसेच पनवेल ते उरण बससेवा सुरु

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोना काळात एसटीच्या फेऱ्या कमी करण्यात आले होते. यामुळे प्रवाशी वर्गांना प्रवास करताना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. कोरोना संपल्यावरही मात्र बसेसच्या (एस टी च्या) फेऱ्या न वाढविल्याने याचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह नोकरदार, कर्मचारी, व्यापारी तसेच शाळा कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थी वर्गांना बसत होता. उरण ते पनवेल व पनवेल ते उरण या मार्गावर प्रवाशी वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. प्रवाशी संख्येचा विचार करता त्या प्रमाणात वाहनांची संख्या फारच कमी होती.

उरण, पनवेल, दादर आदी मार्गावर वाहनांच्या (बसेसच्या ) फेऱ्या वाढविण्यात याव्यात याबाबत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने ऑगस्ट महिन्यात उरण बस डेपो (आगारात )निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाची दखल घेत उरण बस आगाराचे डेपो मॅनेजर सतीश मालचे यांनी रात्रीच्या प्रवाशांची संख्या लक्षात घेता तसेच रात्र पाळीवर काम करणारे नोकरदार यांच्या समस्या लक्षात घेऊन उरणहून पनवेलला जाण्यासाठी रात्री ९.३० वाजता गाडी सुरु केली आहे. ही गाडी (बस) रात्री ९.३० वाजता उरणहून पनवेलला जाण्यासाठी सुटेल. तसेच पनवेलहून उरणला येण्यासाठी रात्री ११.१५ (सव्वा अकरा वाजता) बस सुटेल.

उरण मधील प्रवाशी व पनवेलला जाणारे कामगार वर्ग, रसायनी, खोपोली, तळोजा येथे दुसऱ्या पाळीतील कामगार वर्ग, रात्र पाळीतील कामगार वर्ग यांनी या उरण बस डेपो (आगार) तर्फे सुरू केलेल्या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षातर्फे तसेच उरण बस डेपो तर्फे करण्यात आले आहे.

## तरुण बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**


कोणास काही एक न सांगता एक तरुण कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार सीबीडी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अजय गौतम धुरंधर (२३ रा.टाटानगर, झोपडपट्टी सीबीडी), केस काळे कुरळे, रंग सावळा, भुवया मोठ्या, डोळे काळे, नाक सरळ, दाढी मिशी बारीक, उंची ५ फुट ४ इंच असून अंगात निळ्या रंगाची हाफ पॅन्ट आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास सीबीडी पोलीस ठाणे फोन नं.०२२-२७५८०२५५ किंवा पो. ना.मंगेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## मेंदडीकोंड शिवसेना मोठ्या गटातील ग्रामस्थ राष्ट्रवादी काँग्रेसच्या विकास रथात



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

शिवसेना पक्षाचे मार्फत मेंदडीकोंड गावात विकास होईल या आशेवर अनेक वर्षे वाट पाहात होते परंतु शिवसेना कडून शब्द आणि आश्वासन या पलीकडे गेली २३ वर्षे ठोस असा विकास होत नसल्याने अखेर मेंदडीकोंड येथील शिवसेनेचा मोठा गट ग्रामस्थांनी गावाचा विकास करून घेण्याचा दृढनिश्चय करूनच रायगडाचे लोकप्रिय खासदार सुनिल तटकरे यांच्या विकास रथात बसण्याचा निर्णय घेण्यात आला.

मेंदडी ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करण्यापुर्वी या गावातील पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी १.१२ कोटी रुपयांचे निधीचे आणि सामाजिक सभागृह बांधकामासाठी खासदार निधींतून १५ लक्ष रुपयांचे प्रशासकीय मान्यता पत्र सुपुर्द करण्यात आला.इतके करुनही गावाच्या अधीक विकासासाठी निधीची उपलब्धता करून दिले जाईल असे आश्वासन देत पक्षात प्रवेश केलेल्या ग्रामस्थांचा येथोचीत सन्मान केला जाईल असे खासदार तटकरे यांनी स्पष्ट केले. पक्ष प्रवेश कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष समीर बनकर, जिल्हा चिटणीस महादेव पाटील, जमीर नजीर, अक्रम साठविलकर, छाया म्हात्रे, रेश्मा काणसे, संदीप चाचले, अनिल बसवत, महीला अध्यक्षा सोनल घोले, मीना टिंगरे, महेश घोले, लहू म्हात्रे, मधुकर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. खासदार सुनिल तटकरे यांनी अधिकपने सांगताना आमचे प्रेरणास्थान हे जनता जनार्धनरूपी प्रेम,आशीर्वाद आहे.ते अधिक वृधिंगत करण्यासाठी आमचे प्रयत्न आहे.तुमची उपस्थिती,साथ आणि संगत समाजसेवा करताना येत असलेले क्षीण हरपुन जाते असेही स्पष्ट केले या पुढे ग्रामस्थांनी पक्षाचे बळकटीचे कामासाठी लक्ष केंद्रित करुन निवडणूक काळावधित आधिक पने येण्याची गरज लागणार नाही असे काम करावे. या आधी झालेले मत मतांतर विसरून झाले गेले गंगेला मिळाले असे समजुन कामाला लागा असे स्पष्ट केले. २००९ पासुन मेंदडी गावात अनेक प्रकारचे विकास कामांची पूर्तता करण्यात आली आहे,विकासा सोबत रोजगार आणि हाताला काम मिळण्यासाठी आमचे प्रयत्न असणार आहेत. पक्ष प्रवेश कार्यक्रमाचे प्रास्ताविक कानु कांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना या पुढे एकच पक्ष एकच ध्यास गावाचा विकास. आमच्या गावाचा विकास फक्त आणि फक्त खासदार सुनिल तटकरेच करु शकतात हा विश्वास दृढ झाल्याने आम्ही संपुर्ण ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करीत असल्याचे जाहिर केले.

## महात्मा गांधींना कर्जत शहर काँग्रेसचे अभिवादन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत शहर काँग्रेस समितीच्या वतीने आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

कर्जत शहरातील स्वस्तिक फोटो स्टुडिओ मध्ये कर्जत शहर काँग्रेसच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजलीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जेष्ठ कार्यकर्ते सुभाष मदन यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष धनंजय चाचड, प्रदेश प्रतिनिधी मुकेश सुर्वे, जिल्हा प्रतिनिधी हेमंत देशमुख, शहराध्यक्ष अनंत देवळे, संदीप पाटील, ज्योती जाधव आदी उपस्थित होते. याप्रसंगी महात्मा गांधीजी यांना त्यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मदन यांनी, 'फाळणीचा इतिहास सांगून काही लोक वेगळा इतिहास सांगतात मात्र खरी गोष्ट वेगळी आहे.' असे स्पष्ट केले. देवळे यांनी, 'राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेत सहभागी होण्यासाठी नांदेड येथे जायचे आहे. त्याकरिता जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी नावे द्यावीत म्हणजे नियोजन करणे सोपे जाईल असे सूचित केले.

## माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक ७ ऑक्टोबरला

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानच्या एकंदरीत राजकीय घडामोडी मध्ये सहकार क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि नगरपरिषदेच्या निवडणुकी मध्ये याच पतसंस्थेच्या निवडणुकीच्या आधारावर पुढील अंदाज राजकीय पक्षांची मंडळी बांधत असतात. अनेकदा पतसंस्थेची निवडणूक येथील सर्वंकष दृष्टीने पाहता आजवर बिनविरोध करण्यात आलेली आहे.

परंतु यावेळी सर्व राजकीय पक्षांनी विशेषतः कार्यकर्त्यांनी सुध्दा ही निवडणूक बिनविरोध न करता निवडणुकीच्या द्वारे जे खरोखरच अभ्यासू आणि सहकार क्षेत्राचे ज्ञान आहे अशा–ना पतसंस्थेत जाण्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी ही निवडणूक घेण्यात येत आहे.




याबाबत निवडणूक अधिकारी,माथेरान ना–गरी सहकारी पतसंस्था मर्यादित माथेरानचे शा. प्र.कपोते यांनी प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीत नमूद केले आहे की, मा. सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील आदेश जावक क्रमांक संकीर्ण सनीत ०७२०/ प्र.क्र. १४३/१३ स. दि. १५/०७/२०२२ या आदेशानुसार मुसळधार पावसामुळे विस्कळीत झालेले जनजीवन व वाहतूक व्यवस्था विचारात घेऊन जास्तीत जास्त मतदारांना निवडणुकीमध्ये सहभाग नोंदवता यावा यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे क.क. ७३ मधील तरतुदीनुसार शासनास प्राप्त झालेल्या अधिसूचना २५० किंवा त्यापेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था तसेच ज्या प्रकरणी माननीय सर्वोच्च / माननीय उच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेशित केले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका शासन आदेशाच्या दिनांक पासून ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर दिनांक ३०/०९/२०२२ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्याने माथेरान नागरी सहकारी पतसंस्था लि. माथेरान,तालुका कर्जत जिल्हा रायगड या संस्थेची निवडणूक स्थगित करण्यात आली होती.

मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयीन आदेश जा. क्र. रा. स. नि. प्र./कक्ष–११/शासन निवडणूक सुरु/७१७ सन २०२२ नुसार सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आल्या होत्या त्या टप्प्यापासून सुरू करण्यात याव्यात अशा सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार याद्वारे माथेरान नागरी सहकारी पतसंस्था, माथेरान तालुका–कर्जत, जि. रायगड या संस्थेच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की, संस्थेचे मतदान दि.७/१०/२०२२ रोजी सकाळी ०८–०० ते सायंकाळी ०५–०० वाजेपर्यंत व मतमोजणी सुध्दा त्याच दिवशी सायंकाळी ०५–०० नंतर कम्युनिटी हॉल (शास्त्री हॉल ) येथे घेण्याचे निश्चित केले आहे याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

## प्लास्टिक बंदी कागदावरच ; पाली नगरपंचायत हद्दीत प्लास्टिकचा सर्रास वापर

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पर्यावरण संरक्षणासाठी व नागरिकांच्या आरोग्यावर होणारे घातक परिणाम रोखण्यासाठी शासनाने प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला. परंतु प्लास्टिक बंदी कायद्याची अंमलबजावणी न केल्याने पाली शहरात प्लास्टिक कच–याचे साम्राज्य पसरले आहे. याला नगरपंचायतीचा नाकर्ते पणा कारणीभूत असल्याचे सुजाण नागरिकांचे म्हणणे आहे.

पाली बाजारपेठेत फेरफटका मारल्यास व्यापारी, भाजी–फळ विक्रेते सर्रासपणे प्लास्टिक पिशव्या ग्राहकांच्या माथी मारताना दिसतात. प्लास्टिक वापरावर बंदी संदर्भात दंड आकारण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. परंतु ते अधिकार न वापरल्याने नगरपंचायतीची अवस्था म्हणजे दात नसलेल्या म्हाता–या सिंहासारखी झाली आहे.

जागोजागी प्लास्टिक पिशवीतील कचरा भटक्या गाई, कुत्रे, घुशी यांना आमंत्रण देत आहे. भटक्या जनावरांची समस्या ही ब–याच अंशी कचराकुंडीत उपलब्ध असलेल्या खाद्यामुळेच निर्माण झाली आहे. प्लास्टिक खाल्याने भटक्या जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर वेळीच उपाय केले नाहीत तर भविष्यात प्लास्टिक कचरा उग्र रूप धारण करेल हे मात्र नक्की.



## तळा हायस्कूलमध्ये भोंडला व दांडिया साजरा विद्यार्थ्यांना एक पर्वणी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो म वेदक विद्यामंदिर, प्राथमिक विद्यामंदिर, कनिष्ठ महाविद्यालय व वरीष्ठ महाविद्यालयाच्या वतीने नुकतेच भोंडला व दांडिया या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विद्यार्थिनींनी पारंपारिक गाणी म्हणत फेर धरला.यासाठी प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षिकांनी विद्यार्थिनींनी मार्गदर्शन केले.आश्विनशुद्धप्रतिपदेपासून नवरात्रीच्या सणाला सुरुवात होते.स्त्रीशक्तीचा सन्मान करीत नऊ दिवस मोठ्या उत्साहात हा सोहळा पार पाडला जातो.आश्विन महिन्यात हस्त नक्षत्रापासून भोंडला सुरु होतो. लहान मुली व स्त्रिया एकत्र येऊन पारंपरिक गाणी म्हणत फेर धरतात, यालाच भोंडला असे म्हंटले जाते.

भोंडल्याच्या कार्यक्रमात (हत्तीला) गजांन्त लक्ष्मी प्राप्तीसाठी सर्वात जास्त मान दिला जातो. कोकण प्रांतात घराच्या अंगणात मधोमध पाटावर हत्तीची रांगोळी काढून त्याभोवती लहान मुली फेर धरतात, यावेळी ऐलमा पैलमा सारखी पारंपरिक गाणी म्हंटली जातात. काही ठिकाणी या सणासाठी घराच्या भिंतीवर सोंडेत माळ धरलेल्या व समोरासमोर तोंड केलेल्या दोन हत्तींचे रंगीत चित्र लावले जाते. पाटावर डाळ तांदूळ किंवा धान्याने हत्ती काढतात. हत्ती हे समृद्धीचे प्रतीक मानला जाते. त्यामुळे त्याची पूजा करुन घरात समृद्धी येते असा यामागील विश्वास आहे. पूर्वीच्या काळी स्त्रियांना आपल्या रोजच्या कामातून विरंगुळा मिळावा म्हणून अशा प्रकारचे सण उत्सव साजरे केले जात होते. हायस्कुल मध्येसाजरा केल्याने प्राथमिक पासुन वरीष्ठ महाविद्यालयाच्या मुलींना एक पर्वणीच ठरली आहे.





## मंदिरासह बंद घरात चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील आपटा फाटा येथील श्री स्वामी समर्थ मंदिर व जवळील इमारतीमधील एक घरामध्ये चोरी झाली आहे.

चोरट्यांनी दानपेटीसह बंद घरातील १ लाख रुपयांचे दागिने चोरून नेले आहेत. दानपेटीमध्ये नक्की किती रक्कम होती हे निश्चित नसल्याने किती ऐवज चोरीला गेला हे स्पष्ट झालेले नाही. या दोन्ही घटनांविषयी नवीन पनवेल पोलीस स्टेशनमध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे.

## कारची दुचाकीला धडक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कारने दुचाकीला धडक दिल्याने ५५ वर्षीय डिलिव्हरी बॉय जखमी झाल्याची घटना पनवेल सबवे येथे घडली आहे.

याप्रकरणी कारचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवीन पनवेल सबवेकडून अमरधामकडे येत असताना पनवेलकडे येणाऱ्या कारचालकाने धडक दिली.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग

Government of Maharashtra
**Public Works Department**
(P.W.) Division, Panvel

| | | |
|---|---|---|
| **Telephone No. 022-27452778** | Email -panvel.ee@mahapwd.gov.in | **Fax No.** 022-27467440 |
| E-Tender/O.No./P.W./PNL/4457 | | Date :- 29/09/2022 |

**E- Tender Notice No. 35 Year-2022-23**

E-Tender for the following work in B-1 Form is invited via online e-tendering system from the Registered with Govt. of Maharashtra by **Executive Engineer, Panvel (P.W.) Division, Panvel** on behalf of Government of Maharashtra. Tender Documents can be downloaded from Government of Maharashtra e-tender portal **https://mahatenders.gov.in**

| Sr No | Name of Work | Estimated Cost ( Rs. in Lakhs) | Earnest money (Rs.) | Class of Contractor | E- Tender Form fee GST Add | Time limit in (Calendar Month ) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Renovation of Window and Storage unit in office of Assistant Director Ayurved, 5th floor, Konkan Bhavan, Annexe Building, Navi Mumbai. | 8.23 | 9000/- | Class – VIII& Above | 600/- | 06 Month |
| 2 | Repairs to vertical pipes and other sanitary fittings at all barracks of Taloja Central Jail, Navi Mumbai. | 8.89 | 9000/- | Class – VIII& Above | 600/- | 06 Month |
| 3 | Renovation of Partion in Sales Tax Office 2nd Floor Konkan bhavan main Building at C.B.D. Belapur, navi Mumbai. | 2.70 | 3000/- | Class – VIII& Above | 600/- | 06 Month |

1. Period of E-tenders :- Date 04.10.2022 to Date 18.10.2022
2. Date of Opening (If Possible) :- Date 20.10.2022

**The Executive Engineer, (P.W.) Division, Panvel Reserves right to accept or Reject any offer. Conditional offers will not be accepted.**

**Note:-**

1. All eligible / interested contractors should use the E-tender portal https://mahatenders.gov.in for downloading tender documents and participating in the tender process.
2. If the bidders have any issues or queries regarding online payment and issuing DSC digital certificates and enrollment on the above portal, then the bidder should contact on the following number and address.
   Toll Free No : 1800 3070 2232
   E-Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in
3. It is mandatory to submit all tender related documents online. Also original documents regarding EMD / Security amount, E-tender cost should be submitted within E-tender schedule date and time with keeping privacy for name of the bidder. Otherwise the bidder will not be able to participate in E-tender process.
4. A set of tender documents should be submitted separately in an envelope on or before 18.10.2022 within office hours.
5. As per Government resolution lowest bidder should submit DD/FDR/BG of performance security (L-1) within 8 days after opening of envelop No. II Financial Bid to this office. If the bidder fails to submit the same, the EMD amount will be deposited to Government account and the bidder shall not be entitled to participate in any tender process for one year under this department. Also, tender may be recalled under such case.
6. Other terms and conditions are mentioned in the E-tender.
7. All rights to reject this E-tender process without any reason are kept with competent authority.
8. The tender notice of above work is available on Government portal www.mahapwd.com.

**Executive Engineer**
**P.W.Division**
**Panvel**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,सा.बां.विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.com
**दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स – ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ३५ (ई-निविदा) सन २०२२-२३**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स – ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकुण ३ कामे समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०४.१०.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक १८.१०.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/----
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :-

**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, पनवेल**

क्र.जिमाका/राअ/जाहि/१२५/२०२२–२३